स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रीय
स्तरावरील निवडणूकविषयक कामकाजाची
जबाबदारी निश्चित करण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.६ /का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :१०/०२/२०१५.

## आ दे श

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.

हया विषयी मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्रमांक- ५७५६/२००५, श्री. किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद शहर महानगरपालिका व इतर या प्रकरणी दिनांक १९/१०/२००६ रोजी खालीलप्रमाणे निवाडा दिलेला आहे :-

(i) राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र आहे;

(ii) राज्य निवडणूक आयुक्त यांचा दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या दर्जाशी समतुल्य आहे.

(iii) राज्य निवडणूक आयुक्त यांना, त्यांची जबाबदार पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

(iv) राज्य निवडणूक आयोगाने दिलेले निदेश राज्य शासनावर बंधनकारक आहेत.

(v) राज्य निवडणूक आयोगास उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट ऑफ मेन्डामस (Writ of Mandamus) दाखल करण्याचे स्वातंत्र्य आहे.

२. संविधानातील तरतुदी व मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वच्छ, निर्भय व मुक्त वातावरणात होण्यासाठी विधानसभा व लोकसभा निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून अनुसरण्यात येत असलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे, या निवडणुका घेणे अपेक्षित आहे.

३. राज्यात ५ प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था असून त्यांचा व निवडणूक विषयक जबाबदारीचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| **स्थानिक स्वराज्य संस्था** | **संख्या** | **जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक अधिकारी, निवडणुकांची संपूर्ण जबाबदारी असणारे अधिकारी** |
|---|---|---|
| महानगरपालिका | २६ | महानगरपालिका आयुक्त |
| नगरपरिषद / नगरपंचायत | २३९ | जिल्हाधिकारी |
| जिल्हा परिषद | ३४ | जिल्हाधिकारी |
| पंचायत समिती | ३५१ | जिल्हाधिकारी |
| ग्रामपंचायत | २७७८१ | जिल्हाधिकारी |

४. वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, महानगरपालिका क्षेत्रासाठी निवडणुकांची सर्व जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची आहे. तसेच इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत) निवडणुकांची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे.

५. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा पुर्वेतिहास पाहाता निवडणूक विषयी कोणता अधिकारी जबाबदार आहे याविषयी खालील बाबींमुळे संभ्रम आणि संदिग्धता निर्माण झालेली आहे :-

i) महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१, दि. २९ मार्च, २०१२ अन्वये ही जबाबदारी (महानगरपालिका वगळून) जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांचेवर सोपविण्यात आली आहे.

ii) महानगरपालिका क्षेत्रासाठी एका विशिष्ट अधिकाऱ्याकडे, (उपायुक्त) जबाबदारी देण्यात आलेली नाही. महानगरपालिका आयुक्त यांच्या इच्छेप्रमाणे वेगवेगळ्या अधिकाऱ्यांना ही जबाबदारी सोपविण्यात येते तसेच यामध्ये वारंवार बदल केले जातात.

iii) इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्था (नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत) यांचे काम सुध्दा एका विशिष्ट अधिकारी, (उप जिल्हाधिकारी) पहात नाही. वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये ही जबाबदारी वेगवेगळ्या उप जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात येते तसेच यामध्ये वारंवार बदल केले जातात.

६. आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, निवडणुकांच्या जबाबदाऱ्या विशिष्ट अधिकाऱ्याकडे नसल्यामुळे निवडणुकीमध्ये ज्याप्रकारे लक्ष दिले गेले पाहिजे त्या प्रकारे लक्ष दिले जात नाही. निवडणूक प्रक्रियेमध्ये आवश्यक ती सुधारणा आणि नविन कल्पना अवलंबिण्यात येत नाही. तसेच निवडणुका संपल्यानंतर करावयाची सर्व कामे प्रलंबित राहतात. उदा. निवडणूक खर्च सादर न करणाऱ्या उमेदवारांविरुध्द कारवाई आचारसंहिता भंग करणाऱ्या विरुध्द कारवाई इत्यादी.

७. प्रत्येक जिल्ह्यामध्ये दरवर्षी कोणत्या ना कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुका होत असतात. म्हणून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जबाबदाऱ्या विशिष्ट अधिकाऱ्याकडे असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका जरी ५ वर्षानंतर होणार

असतील तरी निवडणूक संपल्यानंतर कामे करण्यासाठी व नवीन कल्पना अंमलात आणण्यासाठी विशिष्ट अधिकारी असणे आवश्यक आहे.

८. वरील वस्तुस्थिती लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाकडून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

i) **महानगरपालिका क्षेत्रासाठी** :- या क्षेत्रामध्ये निवडणुकीची सर्व जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांचेवर राहील. त्यांनी त्याचे सोयीप्रमाणे एका विशिष्ट उप आयुक्त यांना या कामासाठी नियुक्त करावे.

ii) इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत) निवडणुका घेण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी व उप जिल्हाधिकारी (सामान्य) यांचेवर राहील. जर जिल्ह्यामध्ये उप जिल्हाधिकारी (सामान्य) रिक्त असल्यास ही जबाबदारी निवासी उप जिल्हाधिकारी यांची राहील.

iii) या विशिष्ट उप आयुक्त / उप जिल्हाधिकारी यांना मदतीसाठी आवश्यकतेनुसार इतर कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती / अधिकाऱ्याचे सहकार्य घेण्याची मुभा आयुक्त व जिल्हाधिकारी यांना राहील.

iv) काही महानगरपालिका व जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी काही पद निर्माण करण्यात आली आहेत. त्यावर काही कर्मचारी कार्यरत आहेत. याशिवाय अधिकचे अधिकारी आणि कर्मचारी यांची आवश्यकतेप्रमाणे सेवा अधिग्रहित करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त व जिल्हाधिकारी यांना आयोगाचे दि. २ मार्च, १९९५ च्या अधिसूचनेन्वये देण्यात आले आहेत. या आदेशाप्रमाणे निवडणुका सुरु

होण्यापूर्वी व संपल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी अधिग्रहित कराव्यात.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

प्रदीप व्यास
10-2-2015
( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व महानगरपालिका आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

निवड नस्ती